# आरोग्य विभाग जिल्हा लातूर योजना माहिती

| | | |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रम | राष्ट्रीय कुटुंब कल्याण कार्यक्रमांतर्गत महिलांना कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया साठी अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांना रू.६०० आणि इतर महिला लाभार्थ्यांना रू.२५० इतका लाभ दिला जातो.<br>तसेच पुरुष नसबंदी शस्त्रक्रियासाठी रू,१४५१ लाभ दिला जातो. |
| २ | जननी सुरक्षा योजना | जननी सुरक्षा योजनेअंतर्गत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व दारिद्र्य रेषेखालील गरोदर महिला ( वयाची व खेपेची अट नाही) यांनी शासकीय/मान्यताप्राप्त खाजगी आरोग्य संस्थेत बाळंतपण केल्यास ग्रामीण भागातील महिलेस रू.७००/- व शहरी भागातील महिलेस रू ६००/- अनुदान देण्यात येते.घरी बाळंतपण झाल्यास फक्त बी.पी.एल.कुटुंबातील मातेस रू.५००/- अनुदान वितरीत करण्यात येते.मान्यताप्राप्त खाजगी रुग्णालयात सिझेरिअन झाल्यास रू.१५००/- अनुदान देण्यात येते.जननी सुरक्षा योजनेअंतर्गत प्रा.आ.केंद्र व उपकेंद्र स्तरावर तसेच खाजगी मानांकित रुग्णालयामध्ये बाळंतपणाच्या संख्येमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे.प्रसूती सेवा उपलब्ध असलेल्या खाजगी प्रसूती गृहाची जिल्हा आरोग्य सोसायटी मार्फत तपासणी करून अशा संस्थाना मानाकन प्रमाणपत्र व जननी सुरक्षा योजनेबद्दलचे फलक वितरीत करण्यात आलेले आहे, |
| ३ | प्रधानमंत्री मातृ वंदना योजना | प्रधान मंत्री मातृवंदना योजना हि केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. हि योजना शहरी व ग्रामीण भागामध्ये दिनांक १ जानेवारी २०१७ पासून संपूर्ण राज्यात लागू करण्यात आली आहे. या योजनेची दुसरी आवृत्ती PMMVY २.० हि एप्रिल २०२३ पासून कार्यान्वित करण्यात आली आहे. या योजनेतर्गत पहिल्या व २ऱ्या अपत्यासाठी कागद्पत्रांची पूर्तता केल्यानतर संबधितांच्या आधार सलंग्न बँक खात्यात DBT द्वारे अनुदान जमा करण्यात येते. एकूण दोन टप्प्यात लाभ दिला जातो. **दुसरे अपत्य मुलगी-** असल्यासच दुसऱ्या अपत्यासाठी रु.६०००/-चा लाभ बाळाच्या जन्मानंतर एकाच टप्यात दिला जावा. जर एखाद्या लाभार्थीस तिच्या दुसऱ्या गरोदरपणात एकापेक्षा जास्त (जुळे/तिळे/चार)अपत्य झाली असतील व त्यामध्ये एक किवा अधिक मुली असतील, तर तिला PMMVY २.० नियमानुसार दुसऱ्या मुलीसाठीचा लाभ मिळेल. |